# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १०० वा ❑ गुरूवार दि.२९ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# हेरगिरीचा खेळ कसा चालला?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पाकिस्तानी गुप्तचर संस्थांसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली भारतीय यंत्रणांनी पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये १२ जणांना अटक केली. आरोपींमध्ये युट्यूबर्स, विद्यार्थी आणि सुरक्षा रक्षकांचा समावेश आहे.

भारताविरुद्धच्या थेट युद्धात पाकिस्तानला नेहमीच पराभवाचा सामना करावा लागला आहे. परंतु त्याचे वाईट हेतू अजूनही सुरू आहेत, ज्या अंतर्गत ते दहशतवाद्यांना मदत करतात आणि त्यांना भारताविरुद्ध उभे करतात आणि प्रॉक्सी युद्धाचा अवलंब करतात. त्याचप्रमाणे, हेर तयार करणे आणि भारताची गुप्त माहिती काढणे हे त्यांच्या राज्य धोरणाचा एक भाग आहे. याची जबाबदारी पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयला देण्यात आली आहे.

**ऑनलाइन चॅनेल :**

यूट्यूब, इंस्टाग्राम, व्हॉट्सप ग्रुप्स आणि खाजगी मेसेजिंग ॲप्सद्वारे माहिती शेअर केली जात होती.

**बनावट ओळखपत्रे आणि क्यू-कोड :**

प्रत्येक आरोपीकडे पाकिस्तानी हँडलर्सनी संपर्क एन्क्रिप्ट करण्यास मदत करण्यासाठी ओळखपत्रे आणि क्यू-कोड दिले होते.

रोख व्यवहार – यूपीआय, पेटीएम आणि लहान रोख व्यवहारांद्वारे पैसे पाठवले आणि प्राप्त केले गेले. चौकशीदरम्यान अनेक खाती आणि व्यवहारांची पुष्टी झाली. यामध्ये एका प्रसिद्ध युट्यूबरपासून ते कारखान्यातील चौकीदारापर्यंतच्या लोकांचा समावेश आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की हे सर्वजण एका अत्यंत संघटित नेटवर्कशी जोडलेले होते, जे पाकिस्तानमध्ये तैनात असलेल्या त्यांच्या मदतनीसांना संवेदनशील माहिती देत असे.

**गुप्त बैठका :**

पाकिस्तान उच्चायुक्तालय आणि सीमावर्ती भागात गुप्त बैठका झाल्या जिथे फायली हस्तांतरित झाल्या.

**हेरगिरीसाठी हनीट्रॅप :**

हेरगिरीचे अनेक प्रकार आहेत. त्यात सर्वात भुरळ पाडणारा प्रकार म्हणजे हनी ट्रॅपिंगचा. भारतीय लष्कर, महत्त्वाच्या संरक्षण, विज्ञान संस्थांमध्ये, लष्करात कार्यरत असलेल्या लोकांना एखादी महिला सोशल मीडियावर मैत्रीची विनंती पाठवते. दोघेही एकमेकांच्या संपर्कात आल्यानंतर जो पुरुष आहे तो अनेकदा भुलतो. यालाच 'हनी ट्रॅपिंग' असे म्हणतात. मग त्याच्याकडून देशाबद्दलची संवेदनशील माहिती शत्रूराष्ट्रांचे हस्तक काढून घेतात. पुरुष महिलेच्या पाशात अडकून हेरगिरी करतो, अशी खूप प्रकरणे आहेत. २०२३ मध्ये महाराष्ट्र एटीएसने पुण्यातून डीआरडीओचे शास्त्रज्ञ प्रदीप कुरुलकर यांना अटक केली. कुरुलकर डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून तैनात होते. त्यांच्यावर हनीट्रॅपमध्ये अडकून पाकिस्तानला गुप्तचर माहिती पुरवल्याचा आरोप होता. हेरगिरीसाठी शत्रू देश नव-नवे मार्ग शोधत असतात. नवीन माणसे त्या कामासाठी हेरली जातात. हे चक्र सुरूच असते. आपल्यात भेदी निर्माण होऊ नये, यासाठी प्रत्येक देशाने आपली सुरक्षा यंत्रणा अधिक बांधीव, मजबूत करणे आवश्यक असते. हेरगिरी हा देशद्रोहच आहे..अशांना कठोर शिक्षा करण्याची गरज आहे.

# राष्ट्रीय पातळीवर एमजीएम विद्यापीठ उच्चतम श्रेणीत पात्र होऊन नावलौकिक मिळवेल-डॉ.विजयकुमार धारुरकर

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान हे वरदान ठरत आहे भविष्यकाळात शिक्षणाचा दर्जा आणि त्यातील श्रेष्ठतम यशाचे शिखर गाठण्यासाठी आपण कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र जाणीवपूर्वक वापरले पाहिजे असे विचार भारतीय ज्ञान संस्थेचे संचालक डॉ. वि.ल. धारूरकर यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले की संशोधन आणि विकास हा आधुनिक विकासाचा पाया आहे जर आपण संशोधनपूर्वक शिक्षणाची पुनर्रचना केली तर भारतीय शिक्षण जगातील प्रमुख देशांमध्ये अव्वल दर्जाचे ठरू शकते या दृष्टीने त्यांनी १९८६ चे धोरण आणि ज्ञान आयोगाचा अहवाल ते नवीन शिक्षण धोरण २०२५ पर्यंतचा या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला आणि भविष्यकालीन आव्हानांचे स्वरूप



स्पष्ट केले.

डॉ. विजयकुमार धारूरकर पुढे म्हणाले की भविष्यकाळात आपल्याला नव्या तंत्रांचा उपयोग करून नव्या गुणवत्तेच्या आधारे नवी आव्हाने स्वीकारली पाहिजे. नवीन माहिती तंत्रज्ञान आत्मसात करून पुढे त्या मार्गाने जाणे ही काळाची गरज लक्षात घेऊन आयआयके ने विकसित केलेल्या ग्रोविंग डॉट्स परख या ऐआय वर आधारित सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनचा महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना, प्राध्यापक आणि व्यवस्थापन यांना उपयुक्त ठरेल. एवढेच नव्हे तर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर एमजीएम हे विद्यापीठ उच्चतम श्रेणीत पात्र होऊन नावलौकिक मिळवेल, असा विश्वास आहे. अववलं कोशल्य विकास हे नव्या शिक्षण धोरणाचे ब्रीद आहे. १९३७ साली बिर्ला भवनात महात्मा गांधी म्हणाले होते की, भारतात कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार संधी शिक्षण धोरण म्हणून राबविण्यात आली पाहिजे. एमजीएम विद्यापीठ म्हणूनच गांधी विचारप्रणाली आधारित प्रयोगशाळा व्हावी. प्रारंभी आयआयकेचे कार्यकारी अधिकारी श्री. संजय कुमार जोशी यांनी संस्थेची माहिती दिली आणि प्रास्ताविक केले त्यानंतर सचिन नालापुरे यांनी सादरीकरण केले व या सादरीकरणात त्यांनी संपूर्णपणे उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र कसे वापरता येते याची सर्व चिकित्सक मांडणी करून उदाहरणे दिली. कुलपती श्री अंकुशराव कदम यांनी आयआयकेच्या या नवीन ऐ आय माध्यमातून विकसित केलेल्या ग्रोविंग डॉट्स परखंचे स्वागत केले आणि एमजीएम विद्यापीठाच्या सर्व विभागात आम्ही हे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना लागू करु असे सांगितले.

याप्रसंगी झालेल्या चर्चेत एमजीएम विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक श्री हरिभाऊ शिंदे तसेच तेथील तसेच वैद्यकीय शास्त्राचे प्राध्यापक यांनी भाग घेतला याप्रसंगी डॉ. विजयकुमार धारूरकर यांनी लिहिलेल्या एनईपी ट्रान्सफॉर्मर इंडिया या पुस्तकाचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती श्री अंकुश कुमार कदम आणि कुलगुरू प्रा. डॉ.विलास सकपाळ यांच्या हस्ते एनीपी ट्रान्सफॉरमिंग इंडिया या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक हरिभाऊ शिंदे, फॉरेन्सिक विभाग प्रमुख डॉ. खेमणार, एचआर विभाग प्रमुख श्रीमती कौर, डी वाय पाथरीकर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्राप्ती देशमुख, आदींनी सहभाग घेतला शेवटी श्री संजयकुमार जोशी यांनी आभार मानल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. एमजीएम विद्यापीठाच्या विविध विभागांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.




# नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे वैशाखातील गारवा अनोखा कार्यक्रम संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

**वाशी (प्रदीप बडदे)**– नवी मुंबई साहित्य परिषद मासिक उपक्रमांतर्गत वैशाखातील गारवा हा अनोखा कार्यक्रम तुर्भे येथे संपन्न झाला. साहित्य परिषदेच्या कार्यक्रमासाठी राधा गानू यांनी विषय मांडणी केली. वैशाख वणवा आपल्या सर्वांना माहिती आहे. परंतु वैशाखा मध्ये देखील विशिष्ट प्रकारचा साहित्यिक गारवा कशा प्रकारचा असतो याचे सुंदर विवेचन त्यांनी आपल्या अनुभवातून केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा गवस मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवी मुंबई साहित्य परिषदेचे आधारस्तंभ डॉक्टर नंदकिशोर जोशी, वृक्षप्रेमी आबा रणावरे, वक्ता राधा गानु यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन केले. विशेष म्हणजे शब्द संवाद मे महिन्याच्या अंकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शब्द संवाद अंकांविषयी माहिती क्षमा वखारकर ह्यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मिसाळ यांनी केले. प्रास्ताविकामध्ये नवी मुंबई साहित्य परिषद करत असलेल्या उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी साहित्यिक उपक्रमाचे आयोजन केले जाते. साहित्य परिषदेतर्फे साहित्यिकांसाठी साहित्यिक अभ्यासक्रमाचे आयोजन केले गेले होते. गेली नऊ वर्षे दरवर्षी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. चैत्रपालवी हा विशेष अंक वर्षातून एकदा प्रकाशित केला जातो. नवोदित साहित्यिक लेखक कवी यांच्या साहित्याचे प्रकाशन देखील नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे केले जाते. ह्या कार्यक्रमांमध्ये दिलीपजी जांभळे, संतोष जाधव, ऋतुजा गवस क्षमा वखारकर, मिलिंद कल्याणकर, स्मिता वाजेकर यांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे आभार संतोष जाधव यांनी मांडले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

# वाचकांना सामाजिक व्यथा कवितेतून अभिप्रेत आहेत-स्वागताध्यक्ष रज्जाक शेख

ज्योतिर्मय साहित्य

**श्रीरामपूर** – वारसा साहित्य मंच महाराष्ट्र राज्य आयोजित पहिले मराठी काव्यसंमेलन आणि पुस्तक प्रकाशन छत्रपती संभाजीनगर मधील राजमाता जिजाऊ सभागृहात नुकताच संपन्न झाला. त्यावेळी '' वाचकांना समाजाच्या व्यथा कवितेतून अभिप्रेत आहेत '' असे उदगार साहित्यिक गझलकार रज्जाकभाई शेख यांनी काढले. ते व्यासपीठावरून स्वागताध्यक्ष म्हणून बोलत होते.फक्त मनोरंजन करणाऱ्या कवितांना भविष्य असेलच असे नाही, कवीची लेखणी अन्याय व समाजाच्या वेदना मांडणारी असावी असे मत मांडले.यावेळी

कार्यक्रमाचे उदघाट्क मा.भारत सातपुते सर यांचे अल्प शब्दात अमूल्य मार्गदर्शन लाभले. श्रीरामपूरचे सुप्रसिद्ध गझलकार मा. रज्जाकभाई शेख यांच्या गझललनेनिर्माण केलेला वेगळाच माहोल हा संमेलनाची उंची वाढवणारा ठरला. नाशिकचे सुप्रसिद्ध गझलकार मा. बाळासाहेब गिरी यांची अतिशय मनापासून मनापर्यंत पोहोचलेली ''माझी मुलगी'' गझल व संमेलन अध्यक्षा मा. प्रिया धरूरकर यांचे समारोपाचे अध्यक्षिय भाषण सर्व गोष्टी या पहिल्या कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्यामध्ये आकर्षक ठरल्या.

कार्यक्रमाच्या आयोजक टीम मध्ये काम




करणारे सुत्रसंचालक मा. प्रा. डॉ, सुशिल सातपुते सर यांनी आपल्या उत्कृष्ट सूत्रसंचालनातून कविंच्या कवितेला उत्तम दाद देत कविसंमेलना ला एक वेगळाच आकर्षक रंग चढवला. सर्व कवी देखील कवितेचा आनंद लुटत होते.आयोजक टीम सोबत प्रा. डॉ. सुशिल सातपुते सरांचे विध्यार्थी, आमची मित्र कंपणी, कवी सौरभ आहेर, काव्यगंध प्रकाशन व साहित्य संस्था संस्थापक मा. प्रशांत गोरे, संस्थापिका मा. अक्षशीला ताई शिंदे व कळत नकळत उपस्थित राहिलेल्या बऱ्याच जणांनी आयोजक टीमला मदत केली.

# महाराष्ट्रातील सहा मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली** – विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणा-या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां' ने सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती यांच्या हस्ते दुस-या व अंतिम टप्यात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण व केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ .मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' (मरणोत्तर) तर अशोक सराफ, अच्युत पालव , अश्विनी भिडे-देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी तसेच कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा व वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्काराने राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**डॉ. मनोहर जोशी यांना पद्मभूषण (मरणोत्तर) पुरस्कार प्रदान**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रात अमूल्य योगदानासाठी 'पद्मभूषण' (मरणोत्तर) पुरस्कारने गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांचे सुपुत्र श्री. उन्मेश जोशी यांनी स्विकारला. डॉ. जोशी यांनी पाच दशकाच्या राजकीय कारकिर्दीत मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक, महापौर, आमदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या. सन १९९५ मध्ये ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २००२ ते २००४ या कालखंडात त्यांनी लोकसभा अध्यक्षपद भूषवले. रायगड जिल्ह्यातील नांदवी या गावी जन्मलेल्या जोशी यांनी शिक्षण, शिस्त, आणि कार्यक्षम नेतृत्वाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

**पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार प्रदान**

**अशोक सराफ :**

मराठी चित्रपटसृष्टीतील विनोदी अभिनयाचे सम्राट, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना त्यांच्या कला क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनयातील सहजता, टायमिंग आणि विविध भावछटांचे सशक्त सादरीकरण या बाबींसाठी त्यांना हा सन्मान मिळाला. अशोक सराफ यांचे 'अशी ही बनवाबनवी', 'धुमधडाका', 'बाळाचे बाप ब्रम्हचारी' आणि 'पंढरीची वारी' यासारखे अनेक चित्रपट रसिकांच्या हृदयात कायमचे घर करून आहेत.अशोक सराफ यांच्या अभिनयाचे विशेष कौतुक दिग्गज अभिनेता दिलीप कुमार यांनी देखील केले होते. एका नाटकाच्या प्रयोगादरम्यान दिलीप कुमार यांनी सराफ यांना त्यांच्या अभिनयाच्या टायमिंगसाठी शाबासकी दिली होती. श्री. सराफ यांचा अभिनय जीवनभर अविस्मरणीय ठरला आहे. 'अशी ही बनवाबनवी' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अपार यश मिळवले असून, तो आजही मराठी रसिकांचा आवडता चित्रपट आहे. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमध्येदेखील अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे.

**अच्युत पालव :**

देवनागरी लिपीच्या कलेला नवसंजीवनी देणारे प्रसिद्ध कॅलिग्राफर अच्युत पालव यांना कला क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सर्जनशीलतेतून देवनागरी लिपीचे सौंदर्य आणि शिस्तबद्धता प्रभावीपणे समोर येते.अच्युत पालव यांची कला शैली ही पारंपरिकतेचा गाभा राखत आधुनिकतेशी सुसंगत अशी असून, ते अक्षरांना विशिष्ट आकार, संतुलन आणि कलात्मक स्पर्श देतात. त्यांच्या लेखनातून केवळ पठनीयता जपली जात नाही, तर सौंदर्यदृष्ट्याही ते अक्षरांना एक नवे आयाम मिळवून देतात. ते फक्त भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही देवनागरी लिपीचा प्रचार व प्रसार करतात. त्यांनी विविध देशांमध्ये कार्यशाळा, प्रदर्शने आणि सेमिनार्सद्वारे देवनागरी लिपीची कला आणि तिची वैशिष्ट्ये प्रभावीपणे मांडली आहेत. यासोबत, त्यांच्या प्रकाशित पुस्तकांमुळे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यांमुळे नागरी लिपीला एक स्वतंत्र कला म्हणून प्रतिष्ठा लाभली आहे.

**अश्विनी भिडे-देशपांडे :**

जयपुर-अतत्रौली घराण्याच्या ख्याल गायकी परंपरेतील आघाडीच्या गायिका अश्विनी भिडे-देशपांडे यांना शास्त्रीय संगीत क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बालपणापासून संगीताची गोडी असलेल्या अश्विनी यांनी ''गांधर्व महाविद्यालयातून ''संगीत विशारद'' पदवी प्राप्त केली. पं. नारायणराव दातार आणि आई माणिक भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जयपूर घराण्याची सखोल साधना केली.त्यांच्या गायकीत रागांची सौंदर्यपूर्ण मांडणी, भावाभिव्यक्ती आणि लयकारी यांचे अद्वितीय समन्वय आढळतो. त्यांनी शास्त्रीय गायनाबरोबर ठुमरी, भजन, अभंग यातही निपुणता साधली आहे. एचएमवीसह अनेक नामवंत संगीत कंपन्यांमार्फत त्यांचे अल्बम प्रकाशित झाले आहेत. ''राष्ट्रीय कालिदास सन्मान''(२०१६), ''संगीत नाटक अकादमी पुरस्कार''(२०१५), ''राष्ट्रीय कुमार गंधर्व सन्मान'' (२००५) यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. आजही त्या आपल्या गायन, अध्यापन व कार्यशाळांद्वारे ख्याल गायकीची परंपरा समृद्ध करत आहेत.



**सुभाष शर्मा :**

यवतमाळ जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी सुभाष शर्मा यांना कृषी क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले. नैसर्गिक शेतीच्या विविध पद्धतींचा अवलंब करून त्यांनी हजारो शेतकऱ्यांना प्रेरणा आणि मार्गदर्शन देत आहेत. सुभाष शर्मा यांचे वडील खेतूलाल यांच्या १६ एकर शेतीची जबाबदारी त्यांच्या निधनानंतर त्यांच्यावर आली. मात्र, २०११ मध्ये त्यांनी वडिलोपार्जित शेती विकून तिवसा शिवारात त्यांनी १६ एकर जमीन खरेदी केली. नव्या जमिनीवर त्यांनी नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू केले. मातीची सुपीकता राखण्याचे तंत्र, पिकांचे नियोजन आणि पर्यावरणपूरक पद्धती यामुळे त्यांची शेती देशभरातील शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरली. सततच्या प्रयोगशीलतेने आणि जिद्दीने त्यांनी शेतीत नवदृष्टी निर्माण केली. त्यांचा संघर्ष, नवनिर्मितीचा दृष्टिकोन आणि कृषी क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना पद्मश्री या देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले आहे.

**डॉ. विलास डांगरे :**

७० वर्षीय डॉ. विलास डांगरे यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. होमिओपॅथीच्या माध्यमातून त्यांनी गरजूंच्या आरोग्यसेवेत अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नाडी परीक्षण कौशल्यामुळे ते एक सुप्रसिद्ध होमिओपॅथी चिकित्सक म्हणून ओळखले जातात. खास करून २०१४ मध्ये नागपूरच्या कस्तूरचंद पार्कमध्ये झालेल्या रॅलीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घश्याला त्रास झाला होता, तेव्हा डॉ. डांगरे यांनी केलेल्या उपचारामुळे त्यांना आराम पडला होता. नागपूरमधील त्यांचे क्लिनिक गरजू रुग्णांसाठी आश्रयस्थान ठरले असून त्यांनी आतापर्यंत एक लाखाहून अधिक रुग्णांना उपचार दिले आहेत. १० वर्षा पासून ते दिव्यांग-दृष्टीहीन झाले आहेत. तथापि, त्यावरही मात करत ते आपली अमूल्य सेवा रुग्णांना देत आहेत.

यंदाच्या पद्म पुरस्कार वितरणाची प्रक्रिया दोन टप्प्यात झाली. पहिल्या टप्पयात ७१ जणांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले, यामध्ये मध्ये ४ पद्मविभूषण, १० पद्मभूषण आणि ५७ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. आज उर्वरित ६८ पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये ३ पद्मविभूषण, ०९ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे यंदाच्या पुरस्कार यादीत एकूण १३९ मान्यवरांची निवड करण्यात आली होती. त्यात ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...


## प्रत्येक क्षण हा आयुष्यातील परीक्षेचा नवा विषय

**ज्योतिर्मय साहित्य**

सद्य:स्थितीतील आपली जीवनशैली, दिनचर्या, व्यावसायिक व्यवधानं आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या ह्या सर्व बाबींमुळे अनेकदा आपण स्वतःसाठी सुद्धा पुरेसा वेळ देऊ शकत नाही. अनेक गोष्टींचा थोडा हटके विचार करू शकत नाही अथवा तसा तो करायचा विचारही मनांत येत नाही. एका विशिष्ठ वैचारिक बैठकीच्या चौकटीत राहून मानसिकदृष्ट्या सुखद वातावरणाची आपल्याला सवय झालेली असते. ती चौकट भेदून काही वेगळा विचार करता येऊ शकतो, त्याचा निराळा अनुभव येऊ शकतो हेच आपण लक्षांत घेऊ शकत नाही. आपल्या आयुष्यातले अनेक निर्णय इतरांच्या विचारांनी घेतले जातात किंबहुना त्यांच्या मतांवर ठरत असतात. आपल्या स्वतःसाठी अगदी आपल्याच अंतर्मनांत वैचारिक मंथन आपण का घडवून आणत नाही? प्रत्येक विचाराची सुरुवात सकारात्मकतेनं होणं जरुरीचं, आवश्यक असल्याचं समजून घेतलं पाहिजे.


आपल्या प्रत्येकाच्या जीवनात खरी परीक्षा आपल्या धीराची, सचोटीची, मेहनतीची, हुशारीची, बौद्धिक कौशल्याची असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपण नवीन परीक्षाच देत असतो. अनेकदा ही परीक्षा देताना प्रत्येकाला परीक्षार्थी होणं पसंत नसतं किंबहुना परीक्षकाची भूमिका वठवली जावी असं वाटत असतं. संवादाआभावी अनेक गैरसमज, मतभेद, वादविवाद सुरु होतात. स्वतः पेक्षा दुसऱ्यांकडून, इतरांकडून अवास्तव अपेक्षा केल्या जाऊ लागल्या कि, परस्परांमध्ये तणावाचं वातावरण निर्माण होऊ लागतं. कुटुंबामध्ये संवाद, सहवास, सहकार, सहभाग, समानता ह्या बाबी टिकवून ठेवणं जरुरीचं असतं. त्यायोगे मिळणारं सुख, समाधान, शांती हे सर्व अधिक आवश्यक, महत्वाचं आणि म्हणूनच गरजेचं असतं. ह्यासाठी कुटुंबातील प्रत्येकानं परस्परांच्या संदर्भातील विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवरच केला पाहिजे. हे का आणि कसं असावं, ते समजून घ्यायला आणि अंगीकारायला हवं.

## जे सत्य सुंदर सर्वथा...




**ज्योतिर्मय साहित्य**


रात्री जेवण करीत असताना आम्ही आम्हाला आवडत असणारा सिनेमा किंवा धारावाहिक दाखवणारे चॅनल लावतो. त्यावेळी आम्हाला आनंदात जेवायचे असते. कुठलाही व्यत्यय त्यात नको असतो. उगीचच नको त्या बातम्या पाहून त्यात मिठाचा खडा कशाला ? इतरत्र अस्वस्थता असते, महागाईमुळे सर्वसामान्य होरपळत असतात, भुकेलेल्यांच्या पोटात भुकेचा आगडोंब उसळलेला असतो, अशावेळी आम्ही त्या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून देवादिकांच्या आरत्या ओवाळण्यात धन्यता मानतो. त्यामुळे आमच्या मनाला शांती मिळते. अशा वेळी स्वामी विवेकानंदांचे एक वाक्य मला आठवते. जेव्हा माझ्या देशातील एखादा कुत्रा सुद्धा उपाशी आहे, तोपर्यंत कोणाला धर्माचा उपदेश करण्याचा मला अधिकार नाही. पण असे सांगणारे स्वामी विवेकानंद आम्हाला नको असतात. म्हणून म्हटलं ना आम्हाला सोयीस्कर सत्य स्वीकारायचं असतं. असे सत्यवादी आहोत आम्ही !




राजकीय पक्षात असणाऱ्या नेत्यांना आपल्या पक्षातील चुकीची ध्येयधोरणे, आपल्या पक्षातील लोकांची चुकीची वक्तव्ये कधीही दिसत नाहीत. इतरांवर टीका करण्यात मात्र ते आघाडीवर असतात. इथेही आम्ही सत्याकडे डोळे झाक करतो आणि सोयीस्कर तेवढेच स्वीकारतो ! जनतेलाही सोयीस्कर सत्य स्वीकारायला भाग पाडतो. पाकिस्तानसारखी काही राष्ट्रं आपल्या नागरिकांना सत्यापासून मुद्दामच दूर ठेवतात. धर्मांधतेच्या आणि युद्धखोरीच्या धुंदीत लोकांना अडकवलं जातं. रोजच्या जीवनातील उपासमार, अनेक मूलभूत सुविधा नाहीत, प्यायला शुद्ध पाणी नाही, शिक्षण आणि आरोग्याची वानवा आहे हे सारे वास्तव दडपून टाकलं जातं. युद्धाचे ढोल पिटले जातात, आणि हेच सत्य असल्याचा आभास निर्माण केला जातो. अशा वेळी सामान्य जनतेला खरे काय आणि खोटे काय याचा विचार करण्याची संधीच मिळत नाही. यालाच म्हणतात सोयीस्कर सत्याचा स्वीकार जो यंत्रणांनी जनतेवर लादलेला असतो.

बाहेर पावसाचा टप टप आवाज सुरू असतो. अशावेळी कुठेतरी परिस्थितीने हताश झालेल्या कोणाच्यातरी आसवांचा देखील टप टप आवाज सुरू असतो. पण आपल्याला ऐकू येतो तो फक्त पावसाचा आवाज. दिसतो तो बाहेर पडणारा पाऊस ! नेत्रातून कोसळणारा पाऊस आपल्याला कधी दिसतच नाही किंवा आपल्याला तो बघायचाच नसतो. असे फार थोडे लोक असतात की ज्यांच्या घशाखाली घास उतरत नाही. सैनिकहो तुमच्यासाठी या गीतामध्ये आशा भोसले म्हणतात

भारतीय नागरिकांचा
घास रोज अडतो ओठी, सैनिकहो तुमच्यासाठी. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## नवविधा भक्ति

**ज्योतिर्मय साहित्य**

३)चाचरी----इष्ट देवतेच्या अनुसंधानात मनाला गुंतवून कोणत्याही एका वस्तूवर नजर स्थिर ठेवणे.

४)अगोचरी----मनस्थिर करून पदार्थ पाहून न पाहिल्या सारखे करण.

५)षण्मुखी ---दोन डोळे,दोन कान,नाकपुड्या ,तोंड सारे बंद् करून आंतील सोह ध्वनि ऐकुन तिथे मन स्थिर करून घेणे.

६)महामुद्रा--डाव्या पायाची टाच दाबायची,उजवा पाय लांब करायचा त्याच्या पायावर अंगठा ठेवायचा प्राणायाम करून उजव्या गुढघ्याला डोकं लावायचं अशीच क्रिया दुसऱ्या पायाने पण करायची.

७)शांभवी---मन एकदम रिकामे करायचे फक्त योगावर ध्यान केंद्रित करयचे. दोन्ही डोळे उघडे ठेउन नजर समांतर ठेवायची कल्पनेने ईश्वराशी संवाद करायचा मन एकाग्र ठेवायचे समोर फक्त मी व परमेश्वर आहे. ह्या विचारावर मन केंद्रित करायचे. हळूहळू आपोआप देवाशी एकरूप होतो आपोआप डोळे मिटायला लागतात इष्ट देवता किंवा मंत्र, नामस्मरणात आपण एवढे एकरूप होतो, देह, काल, यांचा विसर पडतो.

प्रत्यक्ष भगवान श्री शंकराला ही मुद्रा साधली म्हणून शांभवीला मुद्रांची महाराणी म्हणतात. असे लिहिले आहे.

सर्व आसनांचा विचार पूढे केला आहे तो कसा ते आता पाहूयात. अतींद्रिय प्रकार


१)शुभ्र प्रकाशाचा झोत २)नीलबिंदुदर्शन

३)ज्योति दर्शन

योगीलोक ज्यांच्यावर मन केद्रित करतात ती शरीरातील चक्रस्थाने ऊदा, मुलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर अनाहत, विशुद्ध आणि आज्ञाचक्र

तसेच शरीर रचनाशास्त्र, विश्व रचना शास्त्र यांची माहिती ऐकत जावी व आपला व्यासंग वाढवत जावा. **(क्रमशः)**

## भवसागर तरून जाण्यासाठी नाम हेच साधन



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम हे स्वत:सिद्ध आहे म्हणूनच ते अत्यंत उपाधिरहित आहे. नाम घेताना आपण पुष्कळदा त्याच्या मागे उपाधी लावतो; उदाहरणार्थ आपण ऐहिक सुखाच्या प्राप्तीकरिता नाम घेतो; किंवा मी नाम घेतो ही अहंकाराची भावना बाळगतो. या उपाधीमुळे आपल्या प्रगतीला बरेच अडथळे येतात. म्हणून नामाकरिताच नामस्मरण करावे आणि तेही सदगुरूच आपल्याकडून करवून घेतात या भावनेने करावे. त्या योगाने अहंकार नष्ट होऊन शरणागती येईल. शरणागती यायला रामनाम हाच रामबाण उपाय आहे. तो आपण करावा. नामाचा महिमा वाचेने सांगणे अशक्य आहे पण हे सांगण्याकरिता तरी बोलावे लागते इतकेच. मनुष्यप्राणी भवसागरात गटांगळ्या खातो आहे; समुद्रातून तरून जाण्यासाठी जशी नाव तसे भवसागरातून तरून जाण्यासाठी भगवंताचे नाम आहे. फक्त एकच दक्षता घेणे जरूर आहे ती ही की नावेत समुद्राचे पाणी येऊ देऊ नये नाहीतर नावेसकट आपण बुडून जाऊ; त्याप्रमाणे संसाररूपी समुद्राचे पाणी नामरूपी नावेत येऊ देऊ नये. म्हणजे कोणत्याही प्रापंचिक अडचणीमुळे नामात व्यत्यय येऊ देऊ नये. तसेच नामाचा उपयोग संसारातल्या अडचणी दूर होण्याकरिता व्हावा ही बुद्धी न ठेवता नामाकरिताच नाम घ्यावे म्हणजे नावेत पाणी न शिरता सुखरूपपणे पैलतीराला म्हणजे भगवंतापर्यंत पोहोचता येते. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते.

देह केव्हा जाईल याचा नेम नाही मग म्हणून म्हातारपणी नामस्मरण करू असे म्हणू नये. अगदी उद्यापासून नामस्मरण करू म्हटले तर उद्याची खात्री आहे का ? आयुष्य क्षणभंगुर आहे ही खात्री प्रत्येकाला आहे म्हणून तर प्रत्येकजण आयुष्याचा विमा उतरवतो. लग्नाला आलेल्या पाहुण्याला लग्न कसे पार पडेल ही काळजी नसते पण घरातल्या माणसाला फार काळजी वाटते. आपल्या प्रपंचात आपण पाहुण्यासारखे वागू या. देहादिक सर्व रामाला अर्पण करून निश्चिंत होऊ या. सोन्यामोत्याचे दागिने घालणारी श्रीमंताची बाई असू द्या बेताचे लहान दागिने घालणारी मध्यम स्थितीतली बाई असू द्या किंवा चांदीची जोडवी आणि नुसते मंगळसूत्र घालणारी अगदी गरिबाची बाई असू द्या त्या सर्वांना कुंकू ज्याप्रमाणे सारखेच असते त्याप्रमाणे कसलाही भेद न ठेवता नाम हे सर्वांना सारखेच साधन आहे. सूर्य हा फक्त प्रकाश देतो पण त्यामुळे अंधार आपोआप नाहीसा होतो. तसेच नाम हे भगवंताचे प्रेम वाढविते; मग आपले दोष आपोआपच नाहीसे होतात. भगवंताचे अस्तित्व आपल्याला जास्त पटत चालले किंवा भगवंताच्या कर्तृत्वाची साक्ष जास्त जास्त अनुभवास येऊ लागली की परमार्थामध्ये आपली प्रगती झाली असे समजावे.

जगण्याकरता श्वास घेणे जसे मनुष्यास जरूरीचे आहे तसेच भगवंताच्या भेटीसाठी प्रत्येक श्वासाबरोबर नाम घेणे अगत्याचे आहे.

## ।। संत महात्म्य ।।

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

## महात्म्यांचा अवीर्भाव भगवान श्रीकृष्णाची लीला स्थाने

**ज्योतिर्मय साहित्य**

भगवंताच्या समवेत बालपणी लीला करताना भगवंताला एक क्षणभरही दृष्टी आड होऊ न देणारी ही बालके यांचे नंतरही अनेक अवतार झालेले आहेत. यांनी कधी स्त्री रूपाने जन्म घेतला तर कधी पुरुष रूपाने.

श्रीवल्लभाचार्य हे महान भक्त होऊन गेले. त्यांनी पुष्टी मार्गाची स्थापना केली. पुष्टी मार्ग हा शुद्ध द्वैत दर्शनावर आधारीत आहे. यात प्रेम हा प्रमुख भाव असतो. आणि या मार्गात परम ध्येय साधनेचे काय असेल तर ते म्हणजे भगवंताचे स्वरूप दर्शन हे होय.आत्म समर्पण भाव यात काठोकाठ भरलेला असतो. यालाच प्रेमलक्षणाभक्ती असेही म्हणतात. भागवतानुसार भगवंताचा अनुग्रह हेच पोषण किंवा पुष्टी आहे याचे मूळ सूत्र उपनिषदातून घेतलेले आहे.

श्रीवल्लभाचार्यांनी आणि त्यांचे नंतर त्यांचे पुत्र श्री विठ्ठल दास यांनी आठ कवीं संतांचां एक समूह स्थापन केला. यालाच अष्टछाप कवी असे म्हटले गेले. हे अष्ट छाप कवी हे दुसरे तिसरे कोणी नसून भगवान श्रीकृष्णाच्या समवेत बालपणी सवंगडी म्हणून जी नावे मी वर उद्धृत केली त्यांचाच आविर्भाव होय. भगवंताच्या समवेत असताना यांच्या कार्याबद्दल स्वतंत्र असा वेगळा इतिहास दिसून येत नाही पण यांचा कलियुगात जेव्हा अविर्भाव झाला तेव्हा त्यांनी भक्तिगंगा जनसामान्यांच्या पर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले. अष्ट छाप कवी मध्ये सर्वप्रथम सूरदास येतात त्यांचे चरित्र आपण आता पाहू

१) सूरदास :- श्री सूरदास यांचा जन्म इसवी सन १४७८ व मृत्यू साधारण १५६३ या वर्षी झाला असावा असे बोलले जाते. त्यांच्या जन्म वर्षाची आणि गावाची निश्चित पणाने माहिती उपलब्ध नाही. पण ते ऋणकटा गाव असावे.हे गावआग्र्याजवळ येते.काहींच्या मते ते सहीरे या गावचे होते.जन्मजात ते अंध होते. त्यांच्या वडिलांचे नाव रामदास होते सारस्वत ब्राह्मण कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्यांचे आयुष्य गऊ घाट आणि गोवर्धन पर्वत येथे गेले. हे जन्मजात अंध असल्याकारणाने घरातील लोकांनी त्यांना बाहेर काढले. आणि वयाच्या सहाव्या वर्षीच त्यांनी घर सोडले. त्यांनी स्वतःच्या रचना गऊ घाट येथे करीत असतानाच, त्या श्रीवल्लभाचार्य यांनी ऐकल्या आणि अत्यंत प्रसन्न होऊन त्यांना श्री वल्लभाचार्यांनी श्री कृष्ण भक्तीची दीक्षा दिली. आणि अष्टछाप कवीमध्ये त्यांची प्रमुख म्हणून गणना झाली.

त्यांनी अनेक स्तुती पर काव्वे लिहिली. वात्सल्य रसाने परिपूर्ण अशा त्यांच्या रचना आहेत. सुरसागर नावाच्या ग्रंथात त्यांच्या रचना सम्मिलित केलेल्या आहेत. त्यांच्या अनेक रचना पैकी ‘‘मै नही माखन खायो‘‘ आणि ‘‘अतिमलीन वृषभानकुमारी‘‘ या रचना प्रसिद्ध. मै नही माखन खायो हे गीत आपण अनेक वेळेस ऐकलेले आहे.

अति मलिन वृर्षभान कुमारी हे गीत हे तितकंच भावना प्रधान असं आहे. श्रीकृष्णाच्या अत्यंत सानिध्यात आणि सात्विक प्रेमात श्री राधा राणी यांचे वस्त्र प्रभूच्या घामामुळे चिंब भिजले. त्या घामालाही दिव्य सुगंध येत होता. प्रभूच्या प्रेमाने स्त्रवलेल्या घामात ती भीजली होती. म्हणून राधा राणी ते वस्त्र बदलू ही इच्छित नव्हती. असा मोहक भाव या पदातून वर्णन केला आहे.

प्रभूच्या आठ सवंगड्याचापैकी कृष्ण या सख्याचा सूरदास हे अवतार होत. वल्लभाचार्यांच्या प्रेरणेने त्यांनी उर्वरित आयुष्य गोवर्धन पर्वतावर व्यतीत केले. त्यांची पदरचना गोड आणि सहजतेने गुणगुणण्यासाठी योग्य होत्या. काव्य गेय आणि प्रासादिक होते. **(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**अप्रियवचनदरिद्रैः प्रियवचनाढ्यैः स्वदारपरितुष्टैः ।**
**परपरिवादनिवृत्तैः क्वचित्क्वचिन्मण्डिता वसुधा ।।**

अर्थ – कठोर वचनांनी रहित, प्रिय वचनांनी युक्त, परस्त्रीची कामना न करणारा, परनिंदेपासून निवृत्त अशा दुर्लभ माणसांनी ही वसुधा क्वचित् क्वचितच अलंकृत होते. गुणी माणसे कशी दुर्लभ असतात, या विषयी भर्तृहरींनी येथे सांगीतले आहे.

**कर्दर्थस्यापि हि धैर्यवृत्ते संभवते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।**
**अधोमुखस्यापि कृतस्य वह्नेर्नाधःशिखा याति कदाचिदेव।**

अर्थ – जसे खाली वाकवले, तरीही अग्नीच्या ज्वाला खाली जात नाहीत, त्या ऊर्ध्व दिशेसच जातात, तसेच विपन्नावस्थेतही धीरोदात्त व्यक्तीचो धैर्यगुण मिटविण्यास कोणीही सक्षम ठरत नाही.

धीरोदात्त व्यक्तिमत्व आणि धैर्य यांमधील अविचलता भर्तृहरींनी या श्लोकाद्वारे स्पष्ट केली आहे. अर्थात धैर्यसंपन्न व्यक्ती कितीही संकट आले, तरी डगमगत नाहीत. अटल राहतात.




**ज्योतिर्मय साहित्य**

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. **(क्रमशः)**




## जुनाट सर्दीदेखील कायमस्वरूपी बरी होऊ शकते

**ज्योतिर्मय साहित्य**

ऋतू बदलाच्या काळात हमखास होणारा आजार म्हणजे सर्दी. प्रत्येकालाच कधी ना कधी सर्दीचा त्रास होतो.

परंतु काहींना मात्र वर्षानुवर्षे सर्दी त्रास देत असते. सर्दीची योग्यवेळी चिकित्सा केली नाही तर पुढे खोकल्यापासून ते दम्यापर्यंत विविध आजार होऊ शकतात.

सर्दीची कारणे

थंड पदार्थांचे सेवन, थंड वातावरणात किंवा एसीत काम करणे, रात्री जागरण, धुळीशी संपर्क येणे, पोट साफ न होणे, गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे, पचन व्यवस्थित नसणे, दिवसा झोपणे या कारणांमुळे सर्दीचा त्रास होतो.

सर्दीची लक्षणे

नाकातून पाणी वाहणे, नाक बंद होणे, वारंवर शिंका येणे, डोके दुखणे किंवा जड होणे, आवाजात बदल होणे, अंग दुखणे, ताप आल्यासारखा वाटणे, दम लागणे अशी अनेक सर्दीच्या रुग्णात सामान्यपणे आढळून येतात. अनेक रुग्णांना तर २-३ रुमाल घेऊन बाहेर पडावे लागते. नाक सतत गळत असते. अनेकांना एकावेळा २०-२० शिंका येतात. धुळीची ॲलजी असणा-यांना धुळीशी संपर्क येताच त्रास सुरू होतो. केवळ चादर झटकल्याचे निमित्त होऊन सर्दीचा त्रास सुरू होतो. औषधे घेतल्यास तात्पुरते बरे वाटते, परंतु परत सर्दीचा त्रास सुरू होतो. वीस-वीस वर्षांपासून सर्दीने त्रस्त असलेले अनेक रुग्ण मी प्रक्टीसमध्ये पाहिलेले आहेत.

सर्दीवरील उपचार

आयुर्वेदीय उपचारांच्या साहाय्याने जुनाट सर्दी देखील कायमस्वरूपी बरी होऊ शकते. पंचकर्मापैकी एक असलेले ‘नस्यकर्म’ हे सर्दीच्या रुग्णांसाठी एक वरदानच आहे. विशिष्ट पद्धतीने औषधी तेल नाकात सोडण्याच्या प्रक्रियेला नस्यकर्म म्हणतात. नस्यकर्मामुळे नासामार्गातील दोष बाहेर पडून सर्दीची लक्षणे त्वरेने कमी होतात. ॲलर्जीमुळे होणा-या सर्दीमध्ये सुद्धा नस्याचा अतिशय उत्तम उपयोग दिसून येतो. यासोबतच काही आयुर्वेदीय औषधांचे सेवन केल्यास अनेक वर्षांच्या सर्दीचा त्रास कमी होऊ शकतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

काय करावे

कोल्ड्रींक्स, आइस्क्रीमसारख्या थंड पदार्थांचे सेवन टाळावे.

केळी, काकडी, दही, टोमॅटो हे पदार्थ टाळावेत.

गरजेपेक्षा अधिक पाणी पिऊ नये.

पोट साफ राहील याकडे लक्ष द्यावे.

केस धुतल्यानंतर लवकर कोरडे करावेत.

शिंका जास्त येत असल्यास ‘क्षवथु तेल ’ नाकात टाकावे.


रात्री सर्दीचा त्रास अधिक होत असेल तर झोपताना थोडे फुटाणे खावेत, त्यानंतर पाणी पिऊ नये.


भाताचे प्रमाण कमी करावे.

शक्यतो एसीचा वापर टाळावा.

***

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या वडिलांच्या आज्ञेप्रमाणे जेव्हा ते जमीनदारीचे काम पाहत असत त्यावेळी त्यांचा संबंध सामान्य लोकांशी येत असे त्याप्रसंगी त्यांच्या कानावर वैष्णवांची भजने, तांत्रिकांची गीते, कीर्तनकारांच्या रचना त्याचप्रमाणे होडीवरील नावाड्याने म्हटलेली गीते पडत असत. या गीतांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्यांच्या असे लक्षात आले की या लोकगीते जाणाऱ्या गायकांना रागदारीची फारशी माहिती नव्हती. तरीही ते तालाचे भान ठेवून गात असत. त्यांच्या रचना हृदयाला भिडणाऱ्या असत. त्यामुळे सूर आणि ताल यांचा अभ्यास केलेल्या रवींद्रनाथांना असे नैसर्गिक गाणे जवळचे वाटू लागले आणि आपल्या प्रेरणेनुसार रागांच्या नियमात ना अडकता ते त्या रागांना नवनवीन रूप देऊ लागले. अशाप्रकारे लोकसंगीतचा समावेश असलेली कीर्तने, भजने, बौद्ध धर्मातील पदे आणि बाऊलांचे गाणे आदींचा प्रभाव पडून त्यांचे अनेक गीते जन्माला आली.

रवींद्रनाथांची संगीत विषयक जाण जसजशी विकसित होत गेली तसतसा त्यांच्या संगीतातही बदल होत गेला जाणकारांच्या मतानुसार त्यांची संगीत तीन टप्प्यात विकसित झाले असे म्हटले जाते त्यातील पहिल्या टप्प्यात त्यांच्यावर पडलेला देशी संगीत, पाश्चात्य संगीत आणि लोकगीतांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो पण त्यातही यातील कोणत्याही प्रकाराची नक्कल न करता त्यातील जे जे चांगले ते त्यांनी घेतले.

रवींद्रनाथांच्या वैयक्तिक जीवनात अनेक आघात त्यांना सोसावे लागले. अनेक दुःखे पचवावी लागली. प्रियजनांचे मृत्यू डोळ्यासमोर पहावे लागले. त्यातूनच त्यांचे मन अध्यात्म आणि मुक्तीकडे ओढ घेऊ लागले. त्यांच्या या भावनांचे प्रतिबिंब त्यांच्या गीत रचनांमध्येही उमटले. अनेक संतांनी आपल्या भक्तीरचना सादर करताना भारतीय संगीत परंपरेतील ध्रुपद रचनेचा अतिशय प्रभावी वापर केला. रवींद्रनाथांना सुद्धा ही ध्रुपद पद्धती आपल्या गीत रचनांसाठी सोयीची वाटल्याने त्यांनी तिचा अवलंब केला. आपल्या पद्यरचनांमध्ये नवनवीन रागांचा वापर आणि मिश्रण करून त्यांनी आपल्या कवितांना चाली लावल्या. भावनेला सुरांची जोड दिली त्यामुळे त्यांची गीते अजरामर ठरली. हेच रवींद्र संगीताचे वेगळेपण आहे. त्यांच्या कवितांमध्ये निसर्ग सौंदर्याचे गुणगान देखील आहे. निसर्गाचे वेगवेगळ्या ऋतूत असलेले सौंदर्य त्यांचे मन मोहून टाकत असे. शांतिनिकेतन मध्ये त्यांनी शारदोत्सव आणि वसंतोत्सव साजरे करायला सुरुवात केली. त्यासाठी त्यांच्या अनेक गीत रचना जन्माला आल्या. या गीतांना संगीतही त्यांनीच दिले. त्यांच्या जीवनातील संगीत विकासातील दुसऱ्या टप्प्यात त्यांनी आपल्या गीत आणि संगीताचे प्रयोग आपल्या नाटकांमध्ये करायला सुरुवात केली.

(क्रमशः)

## 'अवयवदान' ही मानवतेची व सामाजिक बदलाची चळवळ व्हावी -आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर



**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई -:** कुटुंबातील आपला जीवाभावाचा माणूस निघून गेल्यानंतर, ज्या कुटुंबांनी सामाजिक भान जागृत ठेवून अवयवदान करण्याचा निर्णय घेतला त्यांचे मी मनापासून आभार मानतो, त्यांच्या या निर्णयामुळे अनेकांच्या जीवनात नवीन ज्योत प्रज्वलित झाली असून, नव्याने जीवनदान मिळाले आहे, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.


मुंबईतील सायन रुग्णालयातील झेड.टी.सी.सी. () या संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रुग्णालयात अवयवदान केलेल्या कुटुंबातील सदस्यांचा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. आबिटकर यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला झेड.टी.सी.सी.चे अध्यक्ष डॉ. एस.के.माथूर, न्यायमूर्ती संदीप शिंदे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, मुंबईतील खासगी व शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ उपस्थित होते.

मंत्री श्री.आबिटकर म्हणाले की, समाजात अवयवदानाबद्दल असलेले गैरसमज, अकारण भीती, सामाजिक रूढी, चालीरिती या बाजूला ठेवून वेळ प्रसंगी सामाजिक विरोध पत्करून आपण विज्ञानवादाकडे जाणारा अवयवदानाचा विवेकी निर्णय घेतला आहे. त्यामुळे आपण समाजाचे आयडॉल बनला आहात. अलीकडच्या काळात अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. हजारो रुग्ण किडनी, लिव्हर, हृदय अशा अवयवांच्या प्रतीक्षेत असतात. पण प्रत्यक्षात अवयवदानाचं प्रमाण अल्प आहे. त्यामुळे अवयवदानाविषयी समाजात जागृती आणि विश्वास निर्माण करणे, ही आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे.

आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागाने नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. त्यात कोल्हापूर, सोलापूर, अमरावती आणि नाशिक येथे नव्या झेड.टी. सी.सी. केंद्रांची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. झेडसीसीची टीम, संलग्न रुग्णालये, आरोग्य विभाग अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. हे काम एक मिशन म्हणून हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी रुग्णालयाने केवळ सहभाग नव्हे, तर पुढाकार घ्यावा, योग्य समुपदेशनाद्वारे कुटुंबीयांमधील भीती, अंधश्रद्धा दूर करावी, ग्रामीण भागात जागरूकतेसाठी विशेष मोहिमा राबवाव्यात. हे संपूर्ण कार्य ही केवळ वैद्यकीय बाब नाही, तर ही मानवतेची, आणि सामाजिक बदलाची चळवळ आहे, असेही मंत्री श्री. आबिटकर यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र राज्य अवयवदानाच्या क्षेत्रात देशात आदर्श ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

झेड.टी.सी.सी. चे सेक्रेटरी भरत शहा यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. आबिटकर यांचे स्वागत केले व अवयवदान कार्ड काढण्याचे आवाहन केले. अवयव प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात चांगली कामगिरी केलेल्या अपोलो, ब्रिच कँडी, क्रिटीकेअर एशिया, हिरानंदानी, फोर्टीस, एशियन रिलायंस, ग्लोबल, जसलोक, ज्यूपिटर, लिलावती, के.ई.एम. अंबानी, जी.एस.सी, कोकिलाबेन इत्यादी रुग्णालयातील प्रतिनिधींचा यावेळी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.





अरुण वि. देशपांडे-पुणे
9850177342

# आनंदाची लेणी

## चेहेऱ्यावरचा आनंद

**ज्योतिर्मय साहित्य**

संदुक " शब्द खुप दिवसांनी आठवला, म्हटले नव्या पिढीला, यंग जनरेशनला " ओल्ड इज गोल्ड " कशाला म्हणतात? हे सांगण्यासाठी "संदुक" या वस्तूबद्दल लिहावे वाटले.

संदुक " म्हणजे खास ठेवणीतल्या वस्तू ज्या "पारिवारिक भाषेत "मौल्यवान , अशा वस्तू अतिशय काळजीने ठेवण्याची पेटी म्हणजे "बॉक्स" म्हणजेच हा ओल्ड -गोल्ड संदुक "होय.

पिढ्या न पिढ्या परिवारात, या वस्तू विशेष पारिवारिक समारंभ प्रसंगी काढल्या जातात, आजही निमशहरी, आणि छोट्या गावातल्या कुटुंबात "हे मौल्यवान संदुक" व त्यातील वस्तू जीवापाड जपण्याची परंपरा आहे.

आधुनिक दिवसांत या संदुकांची, लोखंडी -पेटीची जागा भलेही बँकेतील लॉकरने घेतली असली तरी, बहुतेक घरात

सणासुदीला सगळा परिवार एकत्र जमतो, तेंव्हा घरातील पणजी-आज्जी, किंवा जेष्ठ सुनबाई,

सगळ्यांना गोलाकार बसवून मधोमध ठेवल्या "संदुक "

मधल्या एकेक वस्तू समोर ठेवीत जुन्या आठवणी सांगतात.

दोन-तीन पिढ्यापासून " खापर- सासूबाई ते आजच्या पिढीतल्या सासूबाई " नव्या सूनबाईना कौतुकाने, आणि मोठ्या अभिमानाने "संदुकातील गोष्टी दाखवतात. हा कौटुंबिक प्रसंग मोठा भावनिक असतो. जुन्या पिढ्यांचे स्मरण करता करता हे धागे नव्या पिढीशी जोडतांना आजच्या आजे-सासूबाई आणि नव्याने सासूबाई झालेल्या दोघींच्याही डोळ्यांच्या कडा पाणावलेल्या आहेत, हे भवताली बसलेले सगळेजण पहात असतात. हा "सेंटी-सीन " नव्या पिढीसाठी एक नवा भावनिक अनुभव असतो. पिढी दर पिढी पारिवारिक परंपरा, रीती-भाती, कुळाचार, सण वार " , याबद्दलची क्रमवार माहिती सहजपणे मिळते.

आजच्या आजे-सासूबाईना त्यांचे या घरातील पाहिले "महालक्ष्मी पूजन"आठवते, तेंव्हा त्यांच्या आजे-सासूबाईनी या नव्या सूनबाईला स्वतःच्या हाताने १०० वर्षांपासूनचे दागिने " लक्ष्मीमाळ, मोहन माळ, पाटल्या, बांगड्या " हे नव्या लक्ष्मीच्या स्वाधीन करतांना म्हटले होते-बाई ग, हे आपले धन तू तुझ्या सुनेला द्यायचे आहे, आत्ता ही जीमेदारी तुझी, मी यातून मोकळी झाले ग बाई! आनंदाने ही जबाबदारी पार पाडणाऱ्या "गृहलक्ष्मी " म्हणजे कुटुंबातील "आनंद-आभूषण " म्हणायला हवे. दिवाळी -पाडवा, लक्ष्मी पूजन , महालक्ष्मी पूजन" या सणाला हमखास मला माझ्या लहानपणीचे दिवस आठवतात. माझी आई सासू झाली त्यावर्षीच्या महालक्ष्मी पूजेच्या दिवशी आता-त्याला पन्नास वर्षे होत आलीत, आईने आमच्या घरातील "संदुक " उघडला, क्षणात आम्ही जुन्या पिढीच्या आठवणीत हरवून गेलो. जीर्ण दिसणारे पण मनाला टवटवीत करणाऱ्या त्या पारंपरिक वस्तू मनाला भारून टाकीत होत्या."भरजरी वस्त्र, शालू, मखमली पडदे, चांदीची भांडी, पूजेचे पितळी ताम्हण, पाण्याचा फिरकीचा तांब्या", जुन्या जन्म पत्रिका, चेहेरे ओळखू न येणारे फिकट फोटो", पुढे अनेक वर्षे हा संदुक "आमच्या परिवारातील मौल्यवान घटक असल्यासारखा होता. काळाच्या ओघात आता"संदुक "नाहीये, पण त्याने दिलेला आनंद सदाबहार आहे.



# इंदापुरी निखारे

## गाजर दाखवून अवलक्षण...!



**ज्योतिर्मय साहित्य**

शाळा सुटली... पाटी फुटली... हे त्या काळात आवडत असले तरी बापाच्या धाकाने ते म्हणण्याचे धैर्य नसलेले अनेकजणं आणि त्या अनेकजणांपैकी तो एक...

शाळा सुटली आणि पाटी पण सुटली ! तशी आधीच पण बोलायची पद्धत म्हणून ! म्हणजे तो पास होऊन कॉलेज मध्ये जाऊ लागला. बाप समोर कधी कधी कौतुक करायचा पण त्यात उपदेशच जास्त असायचा. एकदा चुकून म्हणाला त्याला की तू आता मोठा झाला आहेस ! तुझे तुला काय करायचे ते ठरव. कॉलेज संपले की दुकानात बसायचे... शाळेत असतांना अनेक विषयांच कडबूळ शिकावं लागते. त्यामध्ये विज्ञानात गाजर या विषयी अभ्यास म्हणून माहिती झाली होती. गाजर फार पौष्टिक, आरोग्यासाठी फायदेशीर आणि बरेच काही...

तसेच मराठी भाषेत वेगळ्या अर्थाने गाजर या विषयी माहिती दिली गेली. त्यात ते वाक्प्रचार पण!एकदा त्याचा बाप त्याला काहीतरी सांगत असतांना म्हणाला की जर तू असे केले तर तुला, त्याने उत्तर देतांना म्हणाला उगीचच गाजर नका दाखवू. बापाने मस्त वेगळाच अर्थ पाठीवर समजावून सांगितला होता...

तर शाळेत असतांना गाजर विषयी खूपच चांगला अभ्यास झाल्यामुळे कॉलेज मध्ये त्याचा योग्य उपयोग करायला सुरुवात होते. त्याचे तसेच झाले! त्याला एक मुलगी फार आवडली, आता आवडली की प्रेमात पडायचे एव्हढी अक्कल येतेच! हे आपल्याला कोणी शिकवत नाही किंबहुना हे शिकायची गरज पडत नाही. प्रेमात पडला आणि गाजराचे महत्व वेगळ्याच अर्थाने समजून आले...

प्रेमात पडला त्यामुळे ती भेटली की दाखव गाजर !असा तीन वर्षे लग्नाच्या आधी दाखविण्याचा कार्यक्रम सुरु असल्यामुळे चहा, पोहे कार्यक्रम करावा लागला नाही. फक्त गाजर दाखवून प्रेम आणि लग्न झालेल्या भाग्यवंतापैकी तो एक ते अशासाठी की यांना प्रेमात गुलाबाच्या फुलाचा वापर करावाच लागला नाही कारण अर्थात गाजर !तूच माझा गुलाब असे कुजबुजले की झाले...

तर मग लग्न होते ! प्रेम आणि संसार दोन्ही मध्ये असलेला फरक समजून येतो. मुख्य म्हणजे गाजराचा काही उपयोग होत नाही. काही महिन्यानंतर एक दिवस त्याची बायको गाजरी हलवा करते. तो सहज म्हणाला, अरे व्वा ! आज गाजरी हलवा ! ती पण लगेच म्हणाली, तुम्ही ३ वर्षे गाजर दाखवत होता म्हणून ! तो काहीच बोलला नाही कारण काही बोलला असता तर गाजराची पुंगी वाजतच राहीली असती ! त्याला खरं तर गाजर बिलकुल आवडत नसे...

पण सांगतो कोणाला?

गाजर दाखवले आपण गंडवले जातो आनंदाने हे माहित असल्यामुळे... हात दाखवून अवलक्षण ही म्हण त्याच्याकडे बघून हसत होती...

आणि जोडीला नवीन म्हण होती... गाजर दाखवून अवलक्षण !



## जात्यावरच्या ओव्या......

आपण दोघी जावा
एका न्हाणी वर न्हावी
दुवारीचे (दुरच)शेत
केस वाळवत जाऊ ||९५||

मळ्याच्या मळ्यात
माळणी दोघी जावा
गुलाबाची हवा
वास घेणार गेले गावा ||९६||

*संदर्भ- शांताई इंगळे*
*संकलन- सौ. मनोरमा बोराडे*
*सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर*

## भिशीतले मैत्र - मैत्रीतली हिरवाई...

**ज्योतिर्मय साहित्य**

लग्नानंतर अचानक पूर्ण बदललेला जीवनाचा आयाम.. सासुबाईचे कडक सोवळे. मी २३/२४ वयाची असताना झालेली दोन मुले. अनेक जबाबदाऱ्या, व्याप/ताप या मुळे मन अगदी ग्रीष्मातल्या रोपट्या सारखे मलूल होऊन जात असे. आणि त्या काळी दिवसाचा पूर्ण आढावा, तक्रारी माहेरी सांगण्यासाठी फोन ही नव्हते. (या सगळ्याला अपवादही आहेत) आणि जरी असते तरी आई मलाच ओरडली असती. कारण लग्न झाले की आपला संसार आपण निभावून न्यायचा तक्रार न करता अशी त्या काळच्या बहुतेक सर्व लोकांची धारणा होती..

अशावेळी माझा मुलगा नऊ महिन्याचा होता त्या वेळी माझी ही भिशी सुरू झाली. अगदी ग्रीष्मातल्या संध्याकाळच्या थंड झुळूकी सारखी, मोगऱ्याच्या दरवळी सारखी मन प्रसन्न करणारी.योगायोगाने आम्ही सगळ्याच जणी ब्राम्हण त्यामुळे सासूबाईनी पण आनंदाने परवानगी दिली..

सुरुवातीला आम्ही सगळ्याच मैत्रिणी मुलांना घेऊन भिशीला एकत्र प्रत्येक महिन्याला जिला लागली आहे त्या मैत्रिणीच्या घरी भिशीसाठी जमत होतो. छोटे घर, सगळे पदार्थ घरीच केलेले असायचे.५० रु.पासून सुरू केलेली ही भिशी नंतर २००० रु.पर्यंत आली. आम्हीं १२ जणींनी मिळून ठरविले की आता रु. वाढवायचे नाहीत आणि मैत्रिणींची संख्या ही वाढवायची नाही. हळूहळू आम्हां सर्वांचे आयुष्य बदलत गेले..मुले त्यांचे शिक्षण करियर या मध्ये वैविध्य आले. आता बहुतेक सगळ्यांना जावई/सुना आल्या. नातवंडे येऊ लागली.तारुण्य ते प्रौढ इतक्या प्रवासात खूप काही बदलले. बदलले नाही ते म्हणजे आमचे मैत्र आणि

**सासरचे गाव ... मिरज**



सौ.माधुरी म.इनामदार

त्यातील हिरवाई.

आयुष्याच्या या वळणावर आम्हीं आता भिशी घरी, हॉटेल कुठेही करतो. पण तो दिवस आणि त्या दिवशीची संध्याकाळ आम्हांला भरपूर ऊर्जा देऊन जाते..कारण इतकी वर्षे झाली तरी आमचे आम्हीच भिशीत पाळलेले काही नियम आहेत. आर्थिक स्तर किंवा कौटुंबिक नाती त्यावरील तक्रारी या वर आम्हीं कोणीच बोलत नाही उगीच कोणाला माघारी नावे ठेवणे चर्चा असे अजिबात होत नाही. एक दिवस एकत्र जमून छान खळखळून हसणे, इतर गप्पा आणि आयत्या पदार्थांचे कौतुक करत खाणे हे नक्की करतो. भिशी व्यतिरिक्त. कोजागिरी,३१ डिसेंबर कोणाच्या मुली/ सुनेचे केळवण, डोहाळजेवण इत्यादी साठी एकत्र जमतो. अधून मधून छोट्या मोठ्या सहलीला जातो..त्या प्रवासादरम्यानच्या आठवणीत नेहमीच रमतो..

आयुष्य म्हंटले की संकटे/वेदना आल्याच. तसेच आम्हां सर्व जणींना त्याला तोंड द्यावे लागतेच. अशावेळी आम्ही एकत्र असतो पण नंतर तो विषय बंद करून परत आमची आनंदी संगत सुरू राहते. क्वचित आमच्यात ही कणसूर कोणाचा तरी अधून मधून लागतो. पण त्या कडे दुर्लक्ष करणे आणि तो विषय न वाढविणे हे सगळ्याच जणी करतात त्या मुळे मैत्रीत कधीच दुभंग येत नाही..

पण आता या सर्वांचा निरोप घेऊन मला पुण्याला जावे लागणार आहे. इतक्या वर्षाचा सहवास आता कमी होणार आहे..मला भिशीतून रजा घ्यावीच लागणार आहे त्यामुळे मन हळवे झालेय. पण याची खात्री नक्कीच आहे की आमची मैत्री आणि त्यातील जिव्हाळा तसाच राहील. नेहमीच..

## फुलमाला....



लता गुलाब...

थोडासा आधाराने उमलते ही गुलाबाची लता.
विविध रंगात खुलते हिची आणखीनच मोहकता..

सुंदर गुलाबाची लता (वेल) लावली तर सजेल
तुमचे प्रवेशद्वार
हिच्या सुगंधाची उधळण होता आनंदाला येईल
उधाण फार..

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

https://jyotirmaysahitya.com
ही लिंक उघडेल
साहित्याचे दार
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

# स्त्रियांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना

ज्योतिर्मय साहित्य

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. रुपाली चाकणकर यांच्या कार्याविषयी तसेच महिला आयोग निष्क्रिय असल्याबद्दल चर्चा सुरू आहे. महिला आयोगाने काय कार्य केले आहे याचा डेटा माझ्याकडे आहे पण चिल्लर लोकच जास्त चर्चा करत आहेत असे वादग्रस्त वक्तव्य चाकणकर यांनी केले आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची ऑडिओ क्लिप सोशल मिडीयावर आल्यावर त्यांच्यावर चहूबाजूंन टीका होत आहे. सुषमा अंधारे,किशोरी पेडणेकर, अंजली दमानिया,रोहिणी खडसे,करुणा मुडे, यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या राजीनामाची मागणी केली आहे.किती प्रकरणात त्यांनी अत्याचारीत महिलांना न्याय मिळवून दिला आहे जाहीर करावे अशी विचारणा होते आहे. सोशल मीडियावर ही त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे.सोशल मिडीयावर तर अतिशय वाईट वाईट शब्दात खालच्या पातळीवर प्रतिक्रिया येत आहे.एका मोठ्या राजकीय नेत्याचे नाव घेवून सोशल मिडीयावर प्रतिक्रिया येत आहेत.ही दुर्दैवी गोष्ट आहे.

हा आयोग आहे का महामंडळ अशाही प्रतिक्रिया येत आहे. एखादी स्वाभिमानी स्त्री असती तर तिने तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला असता अशीही प्रतिक्रिया अनेकांनी दिली आहे.

केवळ पोलिसांना या प्रकरणात कारवाई करा म्हणून पत्र देणे,किंवा मेल पाठविणे हे महिला आयोगाचे काम नाही तर गुन्ह्यासाठी योग्य ते कलम लावले गेले आहे का ? आणि तपास योग्य दिशा सुरू आहे का ? पोलीसांवर राजकीय दबाव आहे का ? सुद्धा बघायला हवे असे मत व्यक्त केले जात आहे.

दरम्यान राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याचा विषय हा पक्षांतर्गत आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे .पिडीत महिलांना न्याय मिळुन देण्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत, असेही म्हटले आहे.

महिला आयोगाच्या अध्यक्षपद तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीचं प्रदेशाध्यक्षपद रुपाली चाकणकर यांच्याकडे आहे. एका व्यक्तीकडे दोन दोन पदं कशासाठी? चाकणकर यांच्याकडून महिला आयोगाचं अध्यक्षपद काढून घ्यावं, अशी मागणी पक्षातील एका गटानं केली आहे अशीही माहिती प्रसिद्ध झाली आहे.. चाकणकर यांच्या कार्यपद्धतीवर पक्षात नाराजी आहे. त्यामुळे चाकणकर यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरुन लवकरच गच्छंती होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्या गोष्टी होतीलच पण

आतां ह्यात महत्त्वाचे आहे ते ह्या अन्याय झालेल्या महिलांना न्याय मिळवून देणे. आणि त्याची निपक्षपातीपणे चौकशी करणे.ही आत्महत्या आहे का हत्या हा तपास महत्त्वाचा आहे.आणि दोषींवर कडक कारवाई.व्हायला हवी.

या प्रकरणातही या कुटुंबाचा खासदार,आमदार, तसेच राजकीय व्यक्ती यांच्याशी कौटुंबिक संबंध असल्याचे वेळोवेळी सोशल मीडियावर वाचले आहे ऐकल आहे.ही मंडळी त्यांच्या कार्यक्रमास उपस्थित होते त्याचे छायाचित्रे प्रसिद्ध झाले आहे.

जसे बीड येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंना राजीनामा द्यावा लागला त्याच धर्तीवर या प्रकरणी कोणी संबंधितांनी राजीनामा दिल्याशिवाय निपक्षपातीपणे चौकशी होणार नाही असेही चर्चा होत आहे.


राज्य महिला आयोग महिलांच्या हक्कांचे रक्षण,होणारेअत्याचार रोखणे आणि त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी काम करते. त्यांच्या कामांमध्ये तक्रारी निवारण, कायद्यांची अंमलबजावणी आणि महिलांच्या विकासासाठी उपाययोजनांचा समावेश आहे.

राज्य महिला आयोगाची रचना अशी आहे की अध्यक्ष सहा व शासकीय सदस्य आणि पदसिद्ध सदस्य म्हणून पोलीस महासंचालक असतात.

आता घडलेल्या प्रकरणामुळे एकंदरीत माध्यम आणि सोशल मीडिया वरून जे व्यक्त होत आहेत हे असंतोष आहे तो म्हणजे महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय व्यक्ती किंवा महिला यांची नेमणूक नसावी कारण अशी व्यक्ती नेमणूक झालेले असल्यामुळे नाही म्हटले तरी पक्षाच्या एकूण दबावाखाली असते, त्यामुळे ती निपक्षपातीपणे निर्णय घेऊ शकत नाही, प्रकरणाचा अहवाल देऊ शकत नाही. त्यांची भूमिका व स्पष्ट मत नोंदवू शकत नाही किंवा दुर्लक्ष केले जाते चाल ढकल केली जाते. तेव्हा अशावेळी दोन दोन पद असणाऱ्या राजकीय व्यक्तीकडून कसा न्याय दिला जाईल अशी ही शंका व्यक्त केली जाते आहे .महिला आयोगावर अध्यक्ष म्हणून निवृत्त महिला न्यायाधीश आणि सदस्य म्हणून कुठल्याही पक्षाशी संबंधित नसणारी कायदेशीर ज्ञान असणारी महिला, निवृत्त आय ए एस, आयपीएस, महिला अधिकारी यांची नेमणूक असावी. कारण सदस्य महिला सुद्धा पक्षाशी संबंधित नसाव्यात. अशा महिला सदस्य असल्याचे दिसून येते म्हणजे एकूणच काय तर पक्षातीलच लोकांना कुठल्यातरी जागी नेमणूक करून त्यांना न्याय दिला जातो वर्णी लावली जाते. ही गोष्ट तितकी सत्य आहे आणि नाकारून चालणार नाही. ह्या नेमणूका उच्च न्यायालय, किंवा सर्वोच्च न्यायालया कडून व्हायला हव्यात अशा प्रतीक्रीया मोठ्या प्रमाणात आहे. महिलांवरील अन्याय आणि अत्याचार यासाठी येणाऱ्या तक्रारी चौकशी करून योग्य उपाययोजना करणे तसेच महिलाच्या हक्कासाठी असलेल्या कायद्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी राज्य महिला आयोग काम करत असते. सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी राज्य महिला आयोग विविध योजना आणि कार्यक्रम राबवतात यात शिक्षण, आरोग्य, आणि उद्योजकता याचबरोबर महिलांना संरक्षण यासारख्या बाबीचा प्रामुख्याने समावेश असतो. महिलांच्या अधिकार विशेष जागृतीसाठी गावोगावी कार्यक्रम राबवले जातात असे किती प्रमाणात उपक्रम राबविले जातात हा ही मोठा प्रश्न आहे. आज महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. तसेच अनेक मुली गायब झालेल्या आहेत. निरनिराळ्या जाहिरातीतून महिलांचे शरिराचे उत्तान प्रदर्शन होत आहे. याविषयी महिला आयोगाने आपली भूमिका जाहीर करायला हवी आणि त्याबाबतीत अशा स्त्री शरीराचे देहाची प्रदर्शन करणाऱ्या,विटंबना करणाऱ्यान वरही काहीतरी बंधन आणायला हवे.कारवाई करायला हवी. जेणेकरून समाजात घडणाऱ्या घटना थांबतील. अर्थातच केवळ महिला आयोगाचेच हे काम नसून शासन प्रशासन जनता ह्यांचा सक्रिय सहभाग हवा. तेव्हाच ह्या दृष्ट प्रवृत्तीचा नाश होईल हे तितकेच खरे. आणि अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजकीय व्यक्ती, नेते, यांनीही वाईट दृष्ट, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना आश्रय देऊ नये. आमदार, खासदार, मंत्री, यांचे बरोबर फोटो काढणे, कार्यक्रम, उद्घाटनप्रसंगी बोलावणे, लग्नकार्यात बोलावून आपला दबदबा निर्माण करतात. आणि त्यांच्या जोरावरच अशा व्यक्ती असे कृत्य करायला धजावतात.हे आपण अनेक घटनांमधून बघतोय.त्यांनी जरूर विचार करावा.



दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७








# Splash Pad आणि Rock Garden




ज्योतिर्मय साहित्य

आम्हीं २६ तारखेला सकाळी लेकीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून Splash Pad (शींतोडे) हे वेगळे ठिकाण बघण्यासाठी निघालो. यावेळी आमच्याबरोबर जावयाचे आणखी दोन मित्र आणि त्यांची कुटुंबीय होते. आम्हीं तिथे पोहोचलो त्यावेळी दुपारचे ऊन होते तरीही हवेत गारवा होता. Splash (शिंतोडे) हा अर्थ तिथे मला योग्य वाटला नाही. कारण जे उडणारे पाणी होते ते कारंज्या एवढे मोठे होते. एका निळ्या रंगाच्या मोठ्या टँक मध्ये साधारण गुडघ्या एवढे स्वच्छ पाणी होते.. सतत वेगवेगळ्या बाजूंनी अंगावर पाणी पडत होते.मध्येच मोठे तुषार उडत होते. या मध्येच दोन घसरगुंड्या, झोपाळा या सारखे पाण्यात भिजतच खेळायचे अनेक खेळ होते. बाजूलाच एक मोठी साधारण १० लोक एकाच वेळी घसरू शकतील एवढी पाण्यामध्येच घसरगुंडी होती. अनेक लोक आपल्या कुटुंबीयांसह त्याचा मनसोक्त आनंद घेत होते त्यात आम्हीही सामील झालो. ही दुपार नकळत मला वेगळ्या पद्धतीने रिमझिम सरीत भिजवून श्रावण गारवा देऊन गेली.

थोड्या वेळाने आम्हीं रॉक गार्डन कडे निघालो. साधारण १/२ तासात तिथे आम्ही पोचलो. रॉक गार्डन (खडका मधली बाग) माणूस आपल्या बुद्धीने आणि कष्टाने खडकातही रोपे लावून त्याचे नंदनवन करू शकतो याचे ते आश्चर्यचकित करणारे उदाहरण होते. अनेक वर्षांपूर्वी दहा हजार टन खडक नायगरा येथून आणला होता. ते साडेपाच एकर चे क्षेत्रफळा मध्ये वेगवेगळे प्रयोग करून विविध प्रकारची झाडे लावली होती. प्रवेश द्वारात सुंदर फुलांनी आमचे स्वागत केले. तिथे पहिला फलक वाचला हा की दिवसाच्या प्रत्येक प्रहरात तुम्ही इथल्या झाडांचे नवीनच सौंदर्य अनुभवू शकाल. आणि हळूहळू त्याची सुंदर अनुभूती आम्हाला येऊ लागली. वेगवेगळ्या आकाराची, रंगांची, पानांची लहान, मोठी अशी हजारोंच्या संख्येने असलेली ती सुंदर झाडे बघताना आश्चर्य मनात मावत नव्हते. त्या बरोबरच विविध रंग रूपाची उधळण करणारी मोहक फूल झाडेही मधूनच सौंदर्यात भर घालत होती.

मध्येमध्ये खालीवर जाणारे अनेक नागमोडी रस्ते आणि दगडी पायऱ्यांच्या वाटा होत्या. बसण्यासाठी मोठे खडक होते. तसेच खुर्च्या, बाकही होते. तिथल्या माहितीचे आणि सौंदर्य अनुभूती कशी घ्यावी याचे फलकही सर्वत्र लावले होते. तेथील एका फलकाच्या शेजारी उतरत्या सात पायऱ्या होत्या त्यांनी लिहिले होते की प्रत्येक पायरी वरचे पाऊल तुम्हाला वेगळा निसर्ग दाखवेल आणि एका अनोख्या विश्वात घेऊन जाईल. आणि ते खरे होते. मनाच्या आतपर्यंत उतरणारा, दूरपर्यंत आपल्या नजरेला बांधून ठेवणारा तो नजारा शब्दात न मावणारा एक वेगळी अनुभूती देणारा असाच होता. मधूनच घुंगुरूच्या तालासारखे वाजणारे निळसर रंगाच्या पाण्याचे छोटे छोटे झरे होते. हिरवट निळ्या पाण्याचे रमणीय तळे आणि त्यात उगवलेली विविध रंगांची कमळे पाहून तर मी मंत्रमुग्ध झाले. त्या तळ्याच्या काठी एक फॉरेन युवती शांत पुस्तक वाचत बसलेली दिसली.किती छान वाटले ते बघताना... अनंदातली समृद्धी शोधावी तर त्यांनीच...

माणसांनीच प्रयत्नाने खडकात उभे केलेले ते अनिमिष सौंदर्य, तिथला सुखद गारवा, स्वच्छता आणि त्याहूनही महत्वाचे म्हणजे या निसर्गाची ,सौंदर्याची जाण असलेले त्याची जपणूक करून त्याचा आनंद घेणारे नागरिक सगळेच किती कौतुकास्पद... हे नक्कीच शिकण्यासारखे नाही का?

या संपणाऱ्या दिवसांने आनंद, तृप्ती आणि समाधान तर दिलेच होते पण त्याच बरोबर आत कुठेतरी न पुसला जाणारा एक ठसाही माझ्या मनावर उमटविला होता...

# भूतकाळाचा उजेड वर्तमानात : फजंदार शाळेचा वारसा आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले साहेबांचे नेतृत्व






ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

फजंदार शाळा ही इतिहासाची साक्ष आहे. एका समर्पित शैक्षणिक दृष्टीकोनाची, राष्ट्रप्रेमाच्या संस्कारांची आणि समाजपरिवर्तनाच्या लढ्याची. आजच्या भारताला अशाच शाळांची, शिक्षकांची आणि नेत्यांची गरज आहे, जे केवळ पिढ्या घडवत नाहीत, तर समाजाचे आणि राष्ट्राचे भवितव्य उजळवतात.

तसेच, वहुर येथे हिंदू-मुस्लिम संघर्ष निर्माण झाला मौलाना शौकत अली सेनापती बापट आणि साने गुरुजी यांनी शांततेसाठी भाषणे देऊन सामाजिक सलोखा प्रस्थापित केला. अशा प्रसंगी फजंदार शाळेच्या परिसराने सामाजिक समतेचे उदात्त मूल्य जपले. वहुरमध्ये १८८५ साली पोस्ट ऑफिसची स्थापना झाली, यावरून त्या भागाची प्रगतिशीलता आणि सामाजिक जागरूकता दिसून येते.

या शाळेचा सर्वात उल्लेखनीय पैलू म्हणजे इथूनच शिकलेले विद्यार्थी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी पोहचले. बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांचे उदाहरण हे या शाळेच्या सामाजिक समावेशकतेचे आणि गुणवत्तेचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा वहुर येथे फजंदार शाळेत भव्य स्वागत समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला तेव्हा बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांनी माझ्या जडण घडणी मध्ये शाळेचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. हे मी आयुष्यात कधीही विसरणार नाही. मी नेहमी शाळेचे संस्थापक फजंदार मोहम्मद अब्बास व शिक्षक यांच्या ऋणात राहून इच्छितो. गुलाम मोहम्मद पटेल यांनी बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांच्या शाळेतील आठवणी सांगितल्या आम्ही दोघे वर्गमित्र अंतुले साहेब संपूर्ण वर्गामध्ये उंचीने लहान असले तरी बुद्धिमत्तेची उंची न मोजण्याजोगी होती.

बॅरिस्टर आंदोलन साहेबांचे विशेष म्हणजे ते जुन्या मित्रांना विसरले नाही वहुर येथील सर्व वर्गमित्र नाते कार्यक्रम झाल्यानंतर भेटले. लहानपणी तेजा विधवा अम्मा यांच्या घरी जात होते यांची त्यांनी भेट घेतली. त्या फार वृद्ध झाल्या होत्या त्यांची असते विचारपूस बॅरिस्टरअंतुले साहेब यांनी केली. ज्या होस्टेलमध्ये अंतुले साहेब राहिले त्यांनी कुक अब्बास चारफरे यांच्या घरी भेट दिली. त्यानंतर अंतुले साहेब यांनी पटेल जनाब यांना सांगितले की,आता तुमच्या वाड्यावर बसून चहा घेऊया महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असणारा व्यक्ती किती जमिनीशी जुळलेला आहे हे यातून सिद्ध होते. महाराष्ट्र राज्याचा नेतृत्व करणारा मित्रत्वाला विसरला नाही ;हे अंतुले साहेबांचे एक वेगळेपण होतं.

आजच्या काळात फजंदार शाळेची भूमिका अधिक व्यापक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये फक्त ज्ञानच नव्हे, तर स्वातंत्र्याचे भान, समतेची जाणीव, बंधुतेची भावना व राष्ट्रीय एकात्मतेचा संस्कार रुजवणे ही काळाची गरज आहे. फजंदार शाळा ही भूमिकाही यशस्वीपणे पार पाडत आहे. आज या शाळेची प्रगती महाविद्यालयापर्यंत गेलेली आहे या ठिकाणी जवळपास दोन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहे डोंगरा भागामध्ये सर्वसामान्य मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे यासाठी मोहम्मद अब्बास फजंदार यांचे चिरंजीव अब्दुल रऊफ फजंदार हे यशस्वीरित्या धुरा सांभाळताना दिसत आहे. आज शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत आहे. इथे नीट पासून सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जाते या सर्व यशाचे श्रेय अब्दुल रऊफ फजंदार यांना जाते.

फजंदार शाळेने इतिहासातून प्रेरणा घेत वर्तमानात सामाजिक सलोखा, सांस्कृतिक ऐक्य आणि लोकशाही मूल्ये जपणारे विद्यार्थी घडवावे, हीच खरी राष्ट्रसेवा ठरेल. अशा प्रकारे फजंदार शाळेचा वारसा आजही समाजासाठी दीपस्तंभ ठरतो आहे.

****

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559